इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स **(IFA)**

कला अभ्यास कार्यक्रम

प्रस्ताव प्रस्तुतीसाठी आवाहन

अर्ज पाठवण्याची अंतिम तारीख**:** १० ऑगस्ट २०२६

आवाहन इतर भारतीय भाषांमधे इथे वाचा

२०२५ मध्ये सुरू झालेला IFA (आयएफए) चा कला अभ्यास कार्यक्रम कलांमध्ये संशोधन करण्यासाठी वेगवेगळ्या आणि व्यापक दृष्टिकोनांचे मूल्य जाणतो. या कार्यक्रमांतर्गत आम्ही असे प्रकल्प राबवतो जे सर्जनशील, विद्वत्तापूर्ण आणि/किंवा सांस्कृतिक व्यवहारात रुजलेल्या ज्ञान आणि विचारांच्या स्वरूपांचा शोध घेतात. अशा प्रकल्पांतून भारतातील अभिव्यक्ती व सादरीकरणांचा इतिहास, वैविध्य, यांचे प्रकटन घडून शोधक वृत्ती, संवाद, सखोल मनन आणि प्रयोगशीलता यांसह कला आस्वाद आणखी सखोल कळण्यास मदत होईल.

या सर्व प्रकल्पांसाठी 'कला अभ्यास' या शब्दांची व्याप्ती समजून घेऊया. 'कला अभ्यास' म्हणजे:

- कलांमधे संशोधन करण्याचे, परिभाषित करण्याचे आणि प्रसारित करण्याचे नवीन मार्ग विकसित केले जाऊ शकतात अशी एखादी पद्धत. प्रयोग करू पाहणाऱ्या, दस्तऐवजीकरणापलीकडे जाऊन शोध घेणाऱ्या, कलांमधे संशोधन कोणी करावं, कोणत्या गोष्टींवर संशोधन करणं महत्त्वाचं आहे आणि कसं, ह्या संकल्पनांना आव्हान देणाऱ्या अभ्यासाला आम्ही प्रोत्साहन देतो.

- शरीर, तंत्रज्ञान, वैयक्तिक कथने, आठवणी, अनुभव, नातेसंबंध, आणि कल्पनाशक्ती यांद्वारे जाणून घेण्याच्या आणि विचार करण्याच्या अनोख्या पद्धतींमधून काही प्रघातांची पुनर्कल्पना करणे आणि नवीन संकल्पना रचणे.

- स्वतःच्या सर्जनशील/कलात्मक/सांस्कृतिक कला अभ्यासाचे थेट परीक्षण करणे. आत्म-परीक्षण करणाऱ्या संशोधन प्रक्रिया आणि ज्यामधे व्यक्ती स्वतःच्या किंवा इतरांच्या कला अभ्यासात गंभीरपणे, जिज्ञासूपणे, आणि भविष्याकडे पाहत सहभागी होतात, अशा प्रक्रियांचा शोध घेण्यात आम्हाला रस आहे.

- विद्यमान कथनांवर आणि प्रतिनिधित्वांच्या स्वरूपांवर प्रश्न उपस्थित करणे. विद्यमान कथनं आणि प्रतिनिधित्वांची स्वरूपं वेगवेगळे दृष्टिकोन देतात. हे दृष्टिकोन भारतातील इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि कलात्मक पद्धतींच्या अभिव्यक्तींचे पुनर्परीक्षण करतात. या संशोधनाकडे सामुदायिक सहभाग, कला आणि संबंधित क्षेत्रांच्या इतिहासाचे पुनर्परीक्षण, आणि भविष्यातील कलात्मक प्रक्रिया कशा असतील याचा शोध घेण्याच्या दृष्टीने बघता येईल.

- उपेक्षित आवाजांना व्यक्त होण्याचे एक साधन. यामुळे नवीन भाषा, शब्दसंग्रह आणि स्थानिक संसाधनांची निर्मिती होऊ शकते. यामध्ये 'उपेक्षित' किंवा ‘प्रभावशाली’ म्हणजे नेमके काय, याचे पुनर्मूल्यांकन करणे देखील समाविष्ट असू शकते.

- एक संवाद**.** आम्हाला असे प्रकल्प राबवायचे आहेत जे कला आणि इतर विविध विषयांमध्ये (उदाहरणार्थ, कला आणि विज्ञान, कला आणि तत्वज्ञान, कला आणि डिजिटल माध्यमे,

सिद्धांत आणि सराव) अर्थपूर्ण देवाणघेवाणीला प्रोत्साहन देतात. कलात्मक आणि संशोधन प्रक्रिया, सिद्धांत, संस्कृती, संस्था आणि तंत्रज्ञान यांच्यात सहकार्याचे नवीन प्रकार शोधणाऱ्यांशी संवाद साधण्यास आम्ही उत्सुक आहोत.

- संशोधनाला चालना देणारे भाषांतर. भाषांतराच्या पद्धतीबद्दल अभ्यासपूर्ण संशोधन करू इच्छिणाऱ्या, बहुभाषिक दृष्टीकोणांचा प्रयोग करू इच्छिणाऱ्या, आणि/किंवा भाषांतराच्या सांस्कृतिक मूल्याचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना आम्ही प्रस्ताव पाठवण्यास प्रोत्साहन देतो.

वर निर्देश केलेल्या परिघाबाहेरच्या असल्या तरी कलांमधे संशोधनाच्या कक्षा रुंदावणाऱ्या अर्जांचेही स्वागत आहे.

### प्रकल्पाचा कालावधी:

किमान एक वर्ष आणि जास्तीत जास्त १८ महिने.

### अंदाजपत्रक:

तुम्ही रु. ५,००,०००/- पर्यंतचे अंदाजपत्रक तयार करू शकता. तुम्ही प्रस्तावित अंदाजपत्रकाच्या ३५% पर्यंतच मानधनाची विनंती करू शकता. (कृपया संस्थात्मक खर्च, बांधकाम खर्च किंवा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अंदाजपत्रक तयार करू नका. अंदाजपत्रकामध्ये उपकरणे खरेदी करण्याची परवानगी नाही. परंतु जर तुम्हाला प्रकल्पासाठी उपकरणे खरेदी करायची असतील तर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ती IFA ला परत करावी लागतील.)

### कोण प्रस्ताव पाठवू शकतं?

विद्वान, अभ्यासक संशोधक, कलाकार-कार्यकर्ते, क्युरेटर, अनुवादक, प्रशिक्षक कलाकार, लेखक, तत्वज्ञानी, गेमर, किंवा संशोधन आणि कला सादरीकरण यांतील छेदबिंदूवर स्वतःला स्थान देण्यास इच्छुक असलेले कोणीही.

### प्रस्ताव पाठवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे:

- तुमचा अंतिम प्रस्ताव पाठवण्यापूर्वी, प्रस्तावाबाबत कोणत्याही शंकांचे निरसन करण्यासाठी किंवा प्रकल्प कल्पना विकसित करण्यासाठी, हर्षिता बथवाल, प्रोग्रॅम ऑफिसर, आर्टस् रिसर्च, यांच्याशी harshita@indiaifa.org वर अवश्य संपर्क करावा. ईमेल चा विषय "कला अभ्यासासाठी प्रकल्प प्रस्ताव" असावा. संपर्क करण्याची अंतिम तारीख: ११ जुलै २०२६
- तुम्ही तुमचा प्रस्ताव इंग्रजी किंवा कोणत्याही भारतीय भाषेत लिहू शकता.
- प्रस्तावित प्रकल्पात संशोधन प्रश्न, प्रस्तावित उद्दिष्टे, वैयक्तिक प्रेरणा, आणि सर्व संबंधित व्यक्तींबाबतीत स्पष्टता असली पाहिजे.
- प्रकल्प विकसित करताना त्यात सर्वत्र प्रसारित करता येतील अशी उद्दिष्टे किंवा अशा प्रक्रिया असाव्या यासाठी आम्ही अर्जदारांना प्रोत्साहित करतो. ही उद्दिष्टे किंवा या प्रक्रिया गद्य, दृश्ये, सादरीकरणे, क्युरेटेड कला, शैक्षणिक, अवकाशीय, साहित्य, माहितीपट, ध्वनी, डिजिटल किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या सांस्कृतिक हस्तक्षेपंच्या स्वरूपात असू शकतात. प्रकल्पाचे उद्दिष्ट

व्यापक असले पाहिजे. ते विविध प्रेक्षकांसाठी सुलभ आणि अर्थपूर्ण असले पाहिजे. त्यामुळे विविध प्रकारच्या लोकांना सहभागी करून घेता आले पाहिजे.

- तुमचा अंतिम प्रस्ताव, तुमच्या विस्तृत परिचय, निधी कसा वापरला जाईल हे स्पष्ट करणारे तपशीलवार अंदाजपत्रक एकाच ईमेलमध्ये पाठवावे. ईमेल २५ MB पेक्षा मोठी नसावी. ईमेल harshita@indiaifa.org वर १० ऑगस्ट २०२६ **(भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ११.५९ पर्यंत)** किंवा त्यापूर्वी पाठवावी.

## पात्रता

इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स (IFA) आपल्या विविध कार्यक्रमांतर्गत खालील प्रकल्प राबिते. या कार्यक्रमांतर्गत अर्ज करण्याच्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:

- फक्त भारतीय नागरिकच अर्ज करू शकतात. यामध्ये पीआयओ (पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजिन / भारतीय वंशाच्या व्यक्ती) आणि ओसीआय (ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया / भारतीय मुळाचे परदेशी नागरिक) कार्डधारकांचा समावेश नाही.
- अर्जदारांकडे ओळख आणि नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी पॅन कार्ड आणि खालीलपैकी एक असणे आवश्यक आहे - भारतीय पासपोर्ट किंवा आधार कार्ड किंवा भारतातील मतदार ओळखपत्र.
- केवळ व्यक्ती अर्ज करू शकतात. कोणत्याही प्रकारच्या संस्था अर्ज करू शकत नाहीत.
- प्रकल्पांमध्ये सहयोगी असेलेल्या सर्वांनी भारतीय नागरिक असले पाहिजे.
- आर्थिक गुन्ह्यांचा भूतकाळ असलेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- IFA सोबत मान्य केलेल्या व्यावहारिक बाबींची (डिलिव्हरेबल्स ची) पूर्तता न केलेल्या IFA अनुदानित व्यक्ती पात्र नाहीत.
- कोणत्याही कारणास्तव भविष्यात अर्ज करण्यास मनाई करणारे पत्र IFA कडून मिळालेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- जर संयुक्त बँक खाते असेल तरच अशा एकापेक्षा अधिक व्यक्ती अर्ज करू शकतात. असे संयुक्त खाते नसलेल्या समूहांमधील केवळ एका व्यक्तीनेच समूहातील इतरांना सहयोगी म्हणून सोबत घेत अर्ज करावा.

**निवड प्रक्रिया:** एक बाह्य पॅनेल शॉर्टलिस्ट केलेल्या प्रस्तावांचे मूल्यांकन करेल आणि अर्जदारांना त्यांचे प्रकल्प पॅनेलसमोर सादर करावे लागतील. प्रकल्प निवडीबाबत IFA (आयएफए) चा निर्णय अंतिम असेल.

कृपया लक्षात ठेवा की अपूर्ण प्रस्ताव तसेच अर्जदार जर पात्रता निकषांमध्ये न बसणारे असतील तर त्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

निवडलेले सर्व प्रकल्प IFA तर्फे राबवले जातील.

## महत्त्वाच्या तारखा:

- प्रकल्पाबद्दल शंका निरसन किंवा चर्चा करण्यासाठी अंतिम तारीख: ११ जुलै २०२६
- प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख: १० ऑगस्ट २०२६

- निवडलेले प्रकल्प जाहीर करण्याची तारीख: नोव्हेंबर २०२६
- प्रकल्पाची सुरुवात करण्याची तारीख: जानेवारी २०२७ (यात बदल होऊ शकतो)

***IFA*** सर्व भारतीय भाषांमधे, तसेच इंग्रजीमधे, प्रकल्प करण्यास प्रोत्साहन देते जेणेकरून विविध भाषिक संदर्भांमध्ये योगदान दिले जाईल.

कृपया लक्षात घ्या: मुलांसह सर्वांना साहाय्य दिले जाईल, सर्वांचा आदर केला जाईल आणि सर्वांचे संरक्षण केले जाईल असे सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी ***IFA*** वचनबद्ध आहे. अर्जदाराने सुद्धा हे पाळणे अनिवार्य आहे.